सुराज्य सोलापूर





चंद्रशेखर विद्यालयातील पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांसह शिक्षकवृंद.

## कब-बुलबुल व स्काऊटर-गाईडर यांचा सन्मान

श्रीपूर/प्रतिनिधी

श्री चंद्रशेखर विद्यालय, प्राथमिक शाळा, श्रीपूर , ता. माळशिरस येथील राष्ट्रीय सुवर्ण बाण पुरस्कार,नवी दिल्ली प्राप्त ५ कब मुले व ४ बुलबुल मुली यांना मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी त्यांच्या कक्षात सन्मानित केले .

वयोगट १० वर्षांच्या आतील स्काऊट-गाईड मधील कब -बुलबुल या वयोगटातील राष्ट्रीय स्तरावरील सुवर्ण बाण पुरस्कार हा सर्वोच्च पुरस्कार आहे. या पुरस्कार प्राप्तीसाठी इयत्ता २री ते ४थी तीन वर्षे कार्य करावे लागते.जिल्हास्तर व राज्य स्तरावर परीक्षा उत्तीर्ण होऊन प्राविण्य पदके मिळवावी लागतात.

सोलापूर जिल्ह्यातील श्री चंद्रशेखर विद्यालय, प्राथमिक शाळा ही या पुरस्कारासाठी पात्र ठरली असून दि .२२ फेब्रुवारी या दिवशी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करीत रूद्र सावंत, शंभूराजे मोरे, अविष्कार कवठेकर,रेहान पठाण, अरमान पठाण, वीरा चव्हाण,समृद्धी पवार,अनुष्का रणदिवे,स्वराली तेरदाळे या ९ विद्यार्थ्यांनी पलवल, हरियाणा येथे जाऊन सोलापूर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले . या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर घेऊन जाणारे मार्गदर्शक स्काऊटर शिक्षक आणि सोलापूर जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट तथा लीडर ट्रेनर शंकरराव यादव व करुणा धाईंजे यांचाही सन्मान मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी केला.

यावेळी सोलापूर जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख यांनीही सर्वांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सोलापूर भारत स्काऊट आणि गाईड कार्यालयाचे जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, जिल्हा चिटणीस दत्तात्रय गाजरे, जिल्हा संघटक स्काऊट श्रीधर मोरे, जिल्हा संघटक गाईड अनुसया शिरसाट, लीडर ट्रेनर महादेव पाटील, लतिफा शेख, तसेच कार्यालयीन कर्मचारी विश्वास लिंगराज , रिजवाना पठाण, बंडू बंडगर उपस्थित होते.

# दिलीप माने यांच्या प्रवेशाने काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

## गमावलेला बाणेदार नेता पुन्हा मिळवल्याची भावना

दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी

माजी आमदार दिलीप माने यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्यानंतर दक्षिण सोलापूर तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. त्याचे प्रतिबिंब या तालुक्यातील नेत्यांच्या बोलण्यात उमटत आहे. हा निर्णय दिलीप मालकांना विधानसभेत घेऊन जाईल आणि तालुक्याला पुन्हा एकदा विकासाची दिशा गवसेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

कार्यकर्त्यांच्या मनातील भावना 'सुराज्य'कडे व्यक्त करताना माजी नगरसेवक नागेशअण्णा ताकमोगे म्हणाले, मालक या पक्षप्रवेशाचा निर्णय कधी घेतात याची कार्यकर्ते मानापसून वाट पहात होते. शहरात सत्ताधाऱ्यांमध्ये विकासाच्या दृष्टीचा नेता नसल्यामुळे शहराच्या विकासाचा मुद्दा उपेक्षित राहिला आहे. त्यातच प्रणितीताई लोकसभेवर जाणार असल्याने विधानसभेत सोलापूरचा आवाज उमटवणाऱ्या नेत्याची गरज होती. ती दिलीप मालकांच्या काँग्रेस पक्ष प्रवेशाने











पूर्ण होईल, अशीच आम्हा कार्यकर्त्यांची भावना आहे.

आम्हा कार्यकर्त्यांना उभे करण्यात दिलीप मालकांचा मोलाचा वाटा आहे. आम्ही जे काही आहोत ते दिलीप मालकांमुळेच आहोत, असे म्हटल्यास वावगे होणार नाही, अशी भावनाही ताकमोगे यांनी व्यक्त केली.

माजी नगरसेवक आणि दिलीप माने यांचे बंधू जयकुमार माने यांनी सांगितले की, मालक जे निर्णय घेतील तो आमच्यासाठी 'सर आखोंपर' असेल. त्यांनी सांगायचे आणि आम्ही ते करायचे यात कोणताही बदल होणार नाही. सोलापूरचे धुरंधर राजकीय व्यक्तीमत्व राजकारणाच्या मुख्य प्रवाहात यानिमित्त पुन्हा येत आहे, याचा कार्यकर्त्यांना मनस्वी आनंद होत आहे.

माजी सभापती इंदुमती अलगोंड पाटील म्हणाल्या, सोलापूरचा बाणेदार नेता आहे. आम्हा कार्यकर्त्यांना जी पदे मिळाली, ती त्यांच्यामुळेच मिळाली. प्रामाणिकपणे काम करत आम्ही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहू अशी ग्वाही कार्यकर्ते आम्हाला देत आहेत. हीच त्यांच्या पक्षप्रवेशाने निर्माण झालेल्या उत्साहाची पोचपावती आहे.

दक्षिण तालुका काँगेस अध्यक्ष हरीश पाटील म्हणाले, काँग्रेस पक्ष प्रवेशाचे आम्ही स्वागत करतो. त्यांच्यासारख्या दिलखुलास आणि बाणेदार नेत्यामुळे तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे. पक्षालाही त्यांच्या नेतृत्वाचा लाभ होणार आहे.

काँगेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे म्हणाले, दिलीप माने यांच्या पक्ष प्रवेशाचे आम्ही खुल्या मनाने स्वागत करत आहोत. शिंदे साहेब जो निर्णय घेतील तो पक्षाच्या हिताचा असेल असा आम्हाला विश्वास आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष अमर पाटील म्हणाले, महाविकास आघाडीत दिलीप माने यांच्या सारखा सक्षम नेता असल्याने त्याचे आम्ही स्वागत करत आहोत. महाविकास आघाडीलाच यामुळे अधिक बळ मिळणार आहे.

# तरूणांची आपापसात शिवीगाळ, हाणामारी

## अट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल

सोलापूर/प्रतिनिधी

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनिष काळजे यांच्या कुमठा नाका येथील गुमास्ता सोसायटीतील घरासमोर मंगळवारी (दि.२०) रोजी रात्री ११ ते १ वाजून २० मिनिटांच्या दरम्यान आपआपसातील वादामुळे काही तरुणांची जातीवाचक शिवीगाळ करीत हाणामारीची घटना घडली. याप्रकरणी ११ जणांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

विशाल बाबावाले, आदित्य लंगडेवाले, विवेक पारसवार, किरण धनेवाले, अंकुश व इतर सहा जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. यासंदर्भात ऋषिकेश घोलप (वय २३ रा.बापूजी नगर, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे.

ऋषिकेश घोलप आणि विशाल बाबावाले यांच्यात आपापसातील वादामुळे काळजे यांच्या घरासमोर वाद सुरू होता. विशाल बाबावाले यांनी फोनवरून अर्वाच्य शिवीगाळ करून तू घराबाहेर ये तुला जीवे मारतो असे म्हणल्यामुळे फिर्यादी मनिष काळजे यांच्या घरात गेला. मनीष काळजे यांनी आरोपी बाबावाले आणि फिर्यादी घोलप यांची समजूत काढून भांडणे सोडविले. दोघेही वाद मिटल्यानंतर विजापूर वेस येथे गेले.

> ऋषिकेश घोलप आणि विशाल बाबावाले यांच्यात वाद झाला होता. त्यावेळी बाबावाले यांनी १० ते ११ जणांनी मिळून हाताने व दगडाने घोलप यांना मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याने विशाल बाबावाले याच्यासह ४ जण व अनोळखी ६ जणावर अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. दोन आरोपीना अटक केली असून पुढील तपास सुरु आहे.
>
> **- अजय परमार**
> सहायक पोलिस आयुक्त विभाग २.

मात्र आरोपी विशाल बाबावाले व ऋषिकेश यांच्यात बाचाबाची झाली तेव्हा आरोपीने फिर्यादीची शर्टाची कॉलर पकडून शिवीगाळ केली. रात्री १.२० च्या सुमारास तीन मोटार सायकलवर १० ते ११ जण येऊन घोलप यांना लाथाबुक्क्या व सिमेंटच्या चौकटीच्या तुकड्याने मारून दुखापत केली. अंदाधुंद दगडफेक करत आरडाओरड करून आजूबाजूच्या परिसरात दहशतीचे वातावरण तयार केले.

फिर्यादी व फिर्यादीच्या वडिलांना जातीवाचक शिवीगाळ करून पळून गेले,असे फिर्यादित नमूद आहे. याबाबत अधिक तपास सहायक पोलिस आयुक्त अजय परमार करीत आहेत.



मोका अंतर्गत गुन्हा नोंद असलेल्या फरार आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर वेळापूर पोलिसांचे पथक.

## वेळापूर पोलिसांनी मोक्कामधील आरोपीस केले जेरबंद

वेळापूर/प्रतिनिधी

वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीतीत राहणारा सराईत गुन्हेगार व टेंभुर्णी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमचे कलम ३(१), ३(२), ३(४), ४ व अन्य गुन्ह्यातील सराईत आरोपी रोहित थोरात याला वेळापूर पोलिसांनी जेरबंद केल आहे.

आरोपी रोहित अशोक थोरात (रा. उघडेवाडी, ता. माळशिरस) हा दोन महिन्यापासून फरार होता. अटक टाळण्यासाठी ओळख लपवून राहात होता. बुधवारी (दि.२०) गोपनीय बातमीदार मार्फत मिळालेल्या माहितीनुसार तो खंडाळी (ता.माळशिरस) येथे येणार असल्याचे समजल्याने या ठिकाणी पोलीस पथक पाठवून पाळत ठेवून आरोपीस ताब्यात घेतले. टेंभुर्णी पोलीस ठाण्याकडे पुढील कारवाईसाठी ताब्यात दिले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज उपविभाग नारायण शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी, पोलीस उपनिरीक्षक संजय राऊत, सहायक फौजदार संजय रेगुडे, हवालदार मच्छिंद्र राजगे, देशमुख, भोसले तसेच अकलूज पोलीस स्टेशनकडील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार यांनी ही कामगिरी बजावली.

# मोटरसायकलवरून वाहतूक होणारी गोव्याची दारू जप्त

सोलापूर/प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून जिल्हाभरात अवैध दारूविरुद्ध छापे टाकण्यात येत आहे. याच मोहिमेंतर्गत शेगाव दुमाला हद्दीत मोटरसायकलवरुन गोव्याची दारुची वाहतुक करणाऱ्या दोघांना पंढरपूर पोलिसांनी अटक केली. तसेच त्यांच्याकडून जवळपास पावणे दोन लाखांचा माल ज्पत केला.

पंढरपूर विभागाच्या दुय्यम निरीक्षक श्रद्धा गडदे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे त्यांनी गुरुवारी दुपारच्या सुमारास पंढरपूर तालुक्यातील शेगाव दुमाला गावाच्या हद्दीत पाळत ठेवली असता बालाजी चवरे, (वय २९, रा. पेनुर ता.मोहोळ) व आकाश राजकुमार बनसोडे, (वय २४, रा. बेंद वस्ती कासेगाव, ता. पंढरपूर) हे दोघेही त्यांच्या मोटरसायकलींवर प्लास्टिक पोत्यात गोवा राज्यात विक्रीस असलेली व महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या विदेशी दारुची वाहतूक करताना आढळून आले. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

दोन्ही आरोपींच्या ताब्यातून दोन मोटरसायकली, ७५० मिली क्षमतेच्या रॉयल क्लासिक व्हिस्कीच्या गोवा विदेशी दारूच्या ६० बाटल्या, एक मोबाईल असा एकूण एक लाख ७६ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही आरोपींना मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पंढरपूर यांचे न्यायालयात हजर केले असता त्यांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास दुय्यम निरीक्षक श्रद्धा गडदे करीत आहेत.

ही कारवाई पंढरपूर विभागाचे निरीक्षक पंकज कुंभार , दुय्यम निरीक्षक श्रद्धा गडदे, सहायक दुय्यम निरिक्षक जीवन मुंढे, जवान प्रकाश सावंत, विजयकुमार शेळके व वाहन चालक रामचंद्र मदने यांच्या पथकाने पार पाडली.

# आयपीएल - २०२४ वेळापत्रक : आजपासून सुरुवात

| MATCH | DATE | TIME | VENUE |
|---|---|---|---|
| 1 | MAR 22 | 8:00 PM IST | CHENNAI |
| 2 | MAR 23 | 3:30 PM IST | MOHALI |
| 3 | MAR 23 | 7:30 PM IST | KOLKATA |
| 4 | MAR 24 | 3:30 PM IST | JAIPUR |
| 5 | MAR 24 | 7:30 PM IST | AHMEDABAD |
| 6 | MAR 25 | 7:30 PM IST | BENGALURU |
| 7 | MAR 26 | 7:30 PM IST | CHENNAI |
| 8 | MAR 27 | 7:30 PM IST | HYDERABAD |
| 9 | MAR 28 | 7:30 PM IST | JAIPUR |
| 10 | MAR 29 | 7:30 PM IST | BENGALURU |
| 11 | MAR 30 | 7:30 PM IST | LUCKNOW |
| 12 | MAR 31 | 3:30 PM IST | AHMEDABAD |
| 13 | MAR 31 | 7:30 PM IST | VIZAG |
| 14 | APR 1 | 7:30 PM IST | MUMBAI |
| 15 | APR 2 | 7:30 PM IST | BENGALURU |
| 16 | APR 3 | 7:30 PM IST | VIZAG |
| 17 | APR 4 | 7:30 PM IST | AHMEDABAD |
| 18 | APR 5 | 7:30 PM IST | HYDERABAD |
| 19 | APR 6 | 7:30 PM IST | JAIPUR |
| 20 | APR 7 | 3:30 PM IST | MUMBAI |
| 21 | APR 7 | 7:30 PM IST | LUCKNOW |

IPLT20.COM

#TATAIPL